## आश्रयदाते

मा. श्री. किशोरभाऊ वनमाळी, अध्यक्ष, म. शि. प्र. मंडळ, आरमोरी

मा. श्री. नुरअल्लीभाई पंजवानी, उपाध्यक्ष, म. शि. प्र. मंडळ, आरमोरी

## आमंत्रक

मा. डॉ. लालसिंग खालसा

प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

## समन्वयक

प्रा. डॉ. गजेंद्र कढव

समाजशास्त्र विभागप्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

## सहसमन्वयक

प्रा. गजानन बोरकर

राज्यशास्त्र विभागप्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

## सल्लागार समिती

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. राजेंद्र घोनमोडे | प्रा. डॉ. अशोक सालोटकर |
| प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर | प्रा. डॉ. संजय गोरे |
| प्रा. नोमेश मेश्राम | प्रा. डॉ. पंढरी वाघ |
| प्रा. शशीकांत गेडाम | प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण |
| प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण | प्रा. डॉ. दिलीप रामटेके |
| प्रा. डॉ. छगन मुंगमोडे | प्रा. डॉ. नंदाजी सातपूते |
| प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे | प्रा. डॉ. राजेंद्र मुद्दमवार |
| प्रा. डॉ. विजय गोरडे | प्रा. डॉ. हेमराज लाड |
| प्रा. सीमा नागदेवे | प्रा. डॉ. रजनी वाढई |
| प्रा. डॅ. वसंता कहालकर | प्रा. डॉ. शरयू गहेरवार |
| प्रा. प्रियदर्शन गणवीर | प्रा. डॉ. अशोक खोब्रागडे |
| प्रा. डॉ. मनोज ठवरे | प्रा. डॉ. रवींद्र विखार |
| प्रा. डॉ. विजय रैवतकर | प्रा. डॉ. दिनकर चौधरी |
| प्रा. डॉ. किशोर वासुर्के | प्रा. डॉ. किशोर खोपे |

## संपर्क


प्रा. डॉ. गजेंद्र कढव 9922189282


प्रा. गजानन बोरकर 9420364886


## नोंदणी शुल्क

प्राध्यापक व संशोधक : २००/-

विद्यार्थी : १००/-

VIVEK MUDRANALAYA, GAD. 8888603833





मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी द्वारा संचालित

# महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवानी वाणिज्य महाविद्यालय

आरमोरी, जि. गडचिरोली

नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

व

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवानी वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# एकदिवसीय कार्यशाळा

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा २०१३ : एक आढावा

सोमवार, दि. २ मार्च २०२०



महोदय,

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी द्वारा संचालित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र विभाग व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा आयोजित 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा २०१३: एक आढावा' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन सोमवार, दि ०२ मार्च २०२० ला करण्यात आले आहे. तरी या कार्यशाळेला उपस्थित राहावे, ही विनंती.

### संस्था व महाविद्यालयाविषयी :

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दलितमित्र आमचे प्रेरणास्त्रोत स्व. वामनरावजी वनमाळी यांनी १९८१ मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाची पायाभरणी केली. अगदी सुरुवातीला कला, वाणिज्य शाखेत केवळ चाळीस ते पन्नास विद्यार्थ्यांनी आरंभ केलेल्या या महाविद्यालयात आज कला, विज्ञान व वाणिज्य या तीनही शाखांत प्रामुख्याने दीन, दलित, गरीब, आदिवासी, इतर मागासवर्गीय व इतर मिळून पंधराशेच्यावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याचे सारे श्रेय स्व. वामनरावजी वनमाळी यांना जाते.

पदवी व पदव्युत्तर स्तरावर जवळपास सगळ्याच विषयांत शिक्षणाची संधी असलेले हे जिल्ह्यातील सर्वात मोठे महाविद्यालय आहे. शिवाय गणित, मराठी, इतिहास आणि समाजशास्त्र या विषयांत संशोधन केंद्राची सोय आहे. कम्युनिटी कॉलेजसारखे विविध व्यवसायाभिमुख शिक्षणाची सोय महाविद्यालयात उपलब्ध आहे. महाविद्यालय आतापर्यंत तीनदा नॅकला सामोरे गेले असून नॅक बँगलोरद्वारा 'अ' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. महाविद्यालयातर्फे आज गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक आणि आर्थिक योजना राबविण्यात येत आहेत. महाविद्यालयाने उन्नत भारत अभियानांतर्गत पाच गावे दत्तक घेतले असून गावांच्या विविधस्तरीय विकासासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्न करीत आहे. तद्वतच अंधश्रद्धा निमूर्लन करून विज्ञानविषयक दृष्टिकोन समाजात रुजवित आहे.

### कार्यशाळेविषयी :

महाराष्ट्र ही संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज तसेच फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर, स्वा. सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे या पुरोगामी विचारवंतांची भूमी आहे. या महापुरूषांनी आपले जीवन समाजमनात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आहयात प्रयत्न केले. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्यासारख्या महनीय व्यक्तींनी अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ स्वतंत्रपणे उभारून महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सुसंस्कृत, सुशिक्षित व वैज्ञानिक विचारांनी समृद्ध करण्यासाठी अविश्रांत कष्ट उपसले. आज एकविसाव्या शतकातसुद्धा अज्ञानामुळे नरबळी, अघोरीप्रथा, भोंदुगिरी, जादुटोणा यासारख्या अनिष्ट बाबींनी समाज पोखरला जात आहे. समाजातून अंधश्रद्धेचे निर्मूलन झाले वा नाही हा एक वादाचा व संशोधनाचा विषय आहे. या कायद्याचे सर्व पैलू समजून घेणे आजची गरज आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तसेच सामाजिक कार्यकर्ते यांना अंधश्रद्धा निर्मूलन कायदा ज्ञात करून देणे व त्यायोगे विज्ञाननिष्ठ समाजमनाची निर्मिती करणे, हा या कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्दिष्ट आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाचा वसा जपून जादूटोणा, बुवाबाजी, भोंदूगिरी, नरबळी इ. वर कठोर प्रहार करून सुखी, संपन्न व विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीसाठी आयुष्यभर मनस्वीपणे झटणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्याम मानव. त्यांचे या संदर्भातील कार्य निश्चितच उल्लेखनीय व प्रेरणादायी आहेत. समाजातील अनिष्ट परंपरांना मुठमाती देण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात विज्ञानाला व आधुनिकतेला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी व समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विघातक वृत्तींकडून सामान्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी शासनाने कठोर कायदा केला. **या कायद्याचे प्रकरण बी.ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून आपले प्रखर समाजभान जपणारे गोंडवाना विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. या महत्त्वपूर्ण विषयावर सांगोपांग विचारमंथन करून समाजात अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात जाणीवजागृती व्हावी हा उदात्त विचार बाळगून गोंडवाना विद्यापीठाने सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी आर्थिक सहायता करून आम्हाला उपकृत केले आहे.**

उपविषय :

१. भारतीय समाजातील अंधश्रद्धा
२. आदिवासी संस्कृतीतील अंधश्रद्धा
३. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा २०१३
४. ग्रामीण क्षेत्रातील अशिक्षितपणा
५. काळी जादू, तंत्रविद्या, अघोरी कृत्य, नरबळी प्रथा, अंधश्रद्धा विरोधी कायद्यापुढील आव्हाने
६. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची निर्मिती.

## कार्यक्रमाची रूपरेषा

| | |
|---|---|
| सकाळी ०९.३० ते १०.३० | नोंदणी व अल्पोपाहार |
| सकाळी १०.३० ते १२.३० | उद्घाटन समारंभ |

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | :- | **मा. श्री. किशोरभाऊ वनमाळी,**<br>अध्यक्ष, म. शि. प्र. मंडळ, आरमोरी |
| उद्घाटक | :- | **मा. डॉ. नामदेव कल्याणकर,**<br>कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| बीजभाषक | :- | **मा. डॉ. श्याम मानव,**<br>संस्थापक व राष्ट्रीय संघटक, अधश्रद्धा निर्मूलन समिती |
| प्रमुख अतिथी | :- | **मा. श्री. सुरेश झुरमुरे,**<br>प्रकल्प संचालक, अधश्रद्धा निर्मूलन समिती |
| | :- | **मा. श्री. ॲड गोविंदराव भेंडारकर,**<br>सिनेट सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| | :- | **मा. श्री. नुरअल्लीभाई पंजवानी,**<br>उपाध्यक्ष, म. शि. प्र. मंडळ, आरमोरी |

| | |
|---|---|
| दुपारी १२.३० ते १.०० | संवादसत्र |
| दुपारी ०१.०० ते १.३० | भोजनावकाश |

### दुपारी ०१.३० ते ३.०० प्रथम सत्र

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | :- | **मा. डॉ. श्रीराम कावळे,** अधिष्ठाता, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| प्रमुख वक्ते | :- | **मा. रवींद्र भुयार,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली |
| | :- | **मा. डॉ. धनराज पाटील,**<br>प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| | :- | **मा. डॉ. ज्ञानेश्वर म्हशाखेत्री,**<br>प्राचार्य के. डी. डी. महाविद्यालय, चामोर्शी |

### दुपारी ३.०० ते ४.३० द्वितीय सत्र

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | :- | **मा. डॉ. अनिल शिंदे,**<br>अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| प्रमुख वक्ते | :- | **मा. डॉ. संजय नाकाडे,**<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव |
| | :- | **मा. प्रा. बालाजी दमकोंडावार,**<br>समाजशास्त्र विभाग प्रमुख, नेवजाबाई हितकारीणी महा. ब्रम्हपुरी. |

| | | |
|---|---|---|
| सायं. ४.३० ते ५.०० | | **समारोप व प्रमाणपत्र वितरण** |
| अध्यक्ष | :- | **प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा,**<br>महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी |